महाराष्ट्र शासन

# जिल्हा यात्रा आपत्ती व्यवस्थापन आराखडा/SOP

# वर्धा जिल्हा

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,

## जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा

## संपर्क क्र. (०७१५२) २४३४४६

# वर्धा जिल्हा यात्रा आपत्ती व्यवस्थापन समितीव्दारा निर्गमित.
# स्टॅन्र्डड ऑपरेटिव्ह प्रोसीजर *(SOP)*
# यात्रा *SOP*

मा.अपर मुख्य सचिव,(मदतकार्य व पुनर्वसन) महसूल व वन विभाग,महराष्ट्र राज्य यांचे अशा पत्र क्र.डिमयु-2007/प्र.क्र.68/डिएम-1 दिनांक 19 मार्च,2003 नुसार राज्यात यात्रंाचे नियोजन व अंमलबजावणी करावयाच्या यात्रा विषयक आदर्श कार्यपध्दती तयार करण्यात येत आहे.

राज्यात वेगवेळया भागात निरनिराळया धार्मीक व इतर सामाजिक प्रयोजनसाठी विविध यात्रा भरतात. वर्धा जिल्हा हा सामाजिक, धार्मीक व सांस्कृतीक दृष्ट्या संपन्न जिल्हा आहे. वर्धा जिल्ह्यामध्ये वर्षभरात विविध **34 ठिकाणी वार्षीक यात्रा उस्तव आयोजीत** केले जात असतात. यामध्ये काही ठिकाणावर वार्षीक तर काही ठिकाणावर मासीक यात्रेचे आयोजन होत असते. यातच आजनसरा तह.हिंगणघाट या ठिकाणी साप्ताहिक मोठी यात्रा भरते. प्रत्येक रविवार व बुधवार ला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असुन प्रत्येक भाविक पुरण पोळीचा स्वयंपाक करित असल्यामुळे आगीचा धोका मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकतो. त्या दृष्टिकोनातुन जिल्हा प्रशासनाकडून योग्य ती खबरदारी घेण्याबाबतची कार्ययोजना तयार केली जात आहे. त्याचप्रमाणे, गिरड तह.समुद्रपुर ला सुध्दा प्रत्येक रविवारला भाविकांची स्वयंपाकासह मोठी गर्दी होत असते.

विदर्भाचा सिध्दी विनायक म्हणुन ओळखल्या जाणा-या केळझर तह.सेलू येथील श्री गणेश मंदिरामध्ये महिण्याच्या संकष्टी चतुर्थीला यात्रा भरत असुन हे ठिकाण पौराणिक असुन पांडवकालीन एकचक्र नगर म्हणुन इतिहासात याची नोंद आहे. हे ठिकाण जिल्हा मुख्यालयापासुन 26 किमी अंतरावर असुन ते वर्धा-नागपुर या राज्य मुख्य मार्गावर वसलेले आहे.

त्याप्रमाणे या ठिकाणावरुन 5 किमी अंतरावर वर्धा-नागपुर राज्य मुख्य मार्गाला लागुन खडकी येथे श्री.हनुमान मंदिर आहे. येथे हनुमान जंयती व प्रत्येक शनिवारला मोठी यात्रा भरत असुन भाविकांची भरपुर प्रमाणात गर्दी असते. सदर मंदिर हे मुख्य रस्त्यालगत असल्यामुळे या ठिकाणावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा खोळंबा होऊन अपघात होण्याची शक्यता आहे. त्याकरिता या ठिकाणी सिंन्दी (रेल्वे) पोलीस स्टेशन कडून चोख बंदोबस्त लावण्यात येत असतो. यात्रा कालावधित इथे विशेष पोलीस चौकी उघडण्यात येत असते.

जिल्ह्यातील मोठ्या यात्रांचे ठिकाण म्हणजे विदर्भातील मोठा महादेव म्हणुन ओळखला जाणारा ढगा तह.कारंजा या ठिकाणी महादेवाचे पुरातन मंदिर असुन जंगल व टेकड्यांनी व्यापलेले आहे. या ठिकाणी दरवर्षी महाशिवरात्री,रक्षाबंधन यावेळी मोठी यात्रा भरत असते. या ठिकाणी जिल्ह्यातील प्रहार या स्वयंसेवी संस्थेकडून विविध आवश्यक सोई सुविधा पुरविल्या जात असते.

त्याप्रमाणे नवरात्री दरम्यान जिल्ह्यात महाकाळी,वायगाव (निपाणी) इ.ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रमाणात यात्रा भरत असते. त्यामध्ये महाकाळी येथे महाकाळी धरण असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यटकांची वर्षभर गर्दी असते. या सोबतच वर्धा शहरामध्ये नवरात्री उत्सव दरम्यान दुर्गापुजा उत्सव मंडळातर्फे शहरभर दुर्गा देवीची प्रतिष्ठापना करुन

संपुर्ण रस्ते विविध कमानी लाऊन सुशोभीत केले जाते. विशेषत: सायंकाळी भाविकांची गर्दी वाढत असते येथे पोलीस प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त ठेवल्या जात असतो.

इतरही विविध 34 ठिकाणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात यात्रा भरत असते. त्या प्रत्येक ठिकाणी यात्रेच्या कालावधित जिल्हा प्रशासन,पोलीस विभाग,महसूल विभाग,आरोग्य विभाग व स्थानिक स्वयंसेवी संस्था इत्यादीच्या माध्यमातुन यात्रेच्या बंदोबस्ताकरिता कार्यरत असतात.

वर्धा जिल्ह्यात वणा, बोर, वर्धा, पोथरा, भदाडी इत्यादी मोठ्या नद्या वाहत असुन यात्रेच्या काळात नदीपात्रातुन होणा-या संभाव्य धोका टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना केली जात असते. विशेषत: नदी काठावरिल यात्रेत विशेष खबरदारी घेतली जाते.

जिल्हाधिकारी वर्धा यांचे अध्यक्षतेखाली विविध यात्रांच्या कालावधित कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणुन जिल्हा प्रशासनाकडून पोलीस विभाग, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, स्वयंसेवी संस्था, आरोग्य विभाग, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारण यांचेशी समन्वय साधुन योग्य व आवश्यक तो बंदोबस्त लावण्यात येतो. यात्रेच्या काळात भाविकांना सर्व आवश्यक सुविधा प्राप्त करुन देण्यासाठी पिण्याचे पाणी, तात्पुरते बसस्थानक, प्रवासी निवारा, विजेची सोय उपलब्ध करुन देण्यात येते. काही यात्रेंचे क्षेत्र हे नदी काठावर असल्यामुळे आपत्कालीन संभाव्य धोका टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडून आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिल्या जाते.

- **<u>जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदारी :-</u>**

वर्धा जिल्ह्यात ज्या-ज्या ठिकाणी यात्र भरते त्या सर्व 34 ठिकाणी वेगवेगळी नोंदनीकृत ट्रस्ट स्थापन झालेली असुन त्यांचे मार्फत त्यांचे कार्यक्षेत्रातील यात्रांचे नियोजन केले जात असते. काही यात्रा ह्या टेकडीवर,नदीकाठावर तर काही यात्रा या मोकळ्या मैदानावर भरत असते. विशेषत: टेकडी वरिल व नदी काठा वरिल यात्रेमध्ये कोणत्याही प्रकारची आपत्ती उद्भवु नये याची दक्षता घेतली जाते.

यामध्ये मंदिर परिसरात मंदिर व्यवस्थापन समिती व स्थानिक ग्रामपंचयात आणि अशाससकीय स्वयंसेवी संस्था यांचे कडून भाविकांचे दर्शनासाठी रांग लावण्यात येतात. तसेच दर्शणासाठी प्रवेश करण्याचा व बाहेर निघण्याचा मार्ग वेग-वेगळा ठेवणे जेथे शक्य आहे तेथे ठेवला जातो आणि जेथे शक्य नाही त्या ठिकाणी विशेष दक्षता घेतली जाते.

यात्रेच्या कालावधित कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणुन पोलीस विभागाकडून आवश्यक तेथे संरक्षण कठडे लावून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येतो. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभाग,स्वयंसेवी संस्था यांचेशी समन्वय साधुन योग्य बंदोबस्त करण्यात येतो. यात्रेच्या काळात भाविकांना सर्व सुविधा प्राप्त करुन देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतो. पिण्याचे पाणी, ध्वनीक्षेपक, प्रवासी निवारा, विजेची सोय इत्यादी आवश्यक सोई-सुविधांची उपलब्ध करुन देण्यात येते.

यात्रेच्या ठिकाणी आपातकालीन संभाव्य सर्व प्रकारचे धोके टाळण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे माध्यमातुन विविध विभागामध्ये समन्वय साधुन आवश्यक सोयी सुविधा पुरविल्या जाते.

- **<u>ग्रामपंचायत :-</u>**

जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायत व नगरपरिषद यांच्या क्षेत्रात यात्रा भरते त्या सर्व ग्रामपंचायत व नगरपरषिद मार्फत यात्रांचे पुर्व नियोजन केले जाते. केवळ उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिकोनातुन भाविकांवर कोणत्याही प्रकारचा कर लावण्यात येत नाही. यात्रेमधील दुकानांना परवानगी देताना पोलीस विभागाचा सल्ला घेण्यात येतो. भाविकांना व रहदारीला रस्त्यालगत लावलेल्या दुकांनामुळे कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेतली जाते. त्याचप्रमाणे पाणी,स्वच्छता गृह,दुकान व्यवस्था या बाबींचे नियोजन मंदिर व्यवस्थापन कडून करण्यात येत असते.

- **<u>मंदिर व्यवस्थापन समीती :-</u>**

सर्वच देवस्थान मधल्या व्यवस्थापकीय मंडळाकडून स्थानिक स्वयंमसेवकांच्या माध्यमातुन भाविकांच्या गर्दीचा विचार करुन त्यांच्या सुलभ व सुरक्षित हालचालीसाठी गाभा-यातील प्रवेश व बाहेर जाण्याबाबतचे नियोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे मंदिर व मंदिर परिसर स्वच्छ,सुंदर व निर्मळ ठेवण्याचा प्रयत्न मंडळाकडून करण्यात येतो.

- **<u>पोलीस प्रशासन :-</u>**

जिल्हा पोलीस प्रशासन वर्धा यांचेकडून यात्रेच्या काळात कायदा व सुव्यस्था सांभाळणे,यात्रा काळात घडणारे गुन्हे यांना प्रतिबंध घालणे. वाहतुक नियंत्रण सांभाळणे,दर्शणासाठी आलेल्या भक्तांची रांग लावण्याचे काम स्थानिक स्वयंसेवकांच्या मदतीने करुन घेण्यात येते.

- **स्वयंसेवी संस्थांचा सहभाग :-**

वर्धा जिल्ह्यातील विविध सर्वच ठिकाणी **यात्रांचे** नियोजन करण्यासाठी स्थानिक पोलीस बंदोबस्त सोबतच स्थानिक स्वयंसेवी संस्था व स्वयंसेवक तसेच गृहरक्षक दलाची सेवा उपलब्ध करुन देण्यात येते. सर्व संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी, उपविभागीय अधिकारी,तहसिलदार,यांचेवर संबंधित यात्रेंच्या सुव्यवस्थेची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

- **<u>बेशिस्त भाविकांवर नियंत्रण :-</u>**

जिल्ह्यातील यात्रा ठिकाणावर यात्रेचे नियोजन हे पोलीस विभाग तसेच त्या-त्या मंदिराचे व्यवस्थापकीय मंडळ यांचे मार्फत करण्यात येते. भाविकांच्या गर्दीचा विचार करुन बेशिस्त भाविकांवर नियंत्रण ठेवण्याचे काम पोलीस प्रशसनाकडून करण्यात येते.

- **<u>मुलभुत सुविधांची व्यवस्था :-</u>**

यात्रेच्या कालावधित कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणुन जिल्हा प्रशासनातर्फे पोलीस विभाग,राज्य मार्ग परिवहन विभाग,स्वयंसेवी संस्था यांचेशी समन्वय साधुन योग्य बंदोबस्त करण्यात येतो आणि सर्व प्रकारच्या आवश्यक मुलभुत सुविधा यात्रेच्या ठिकाणी पुरविण्यात येतात.

- **<u>नियंत्रण कक्ष :-</u>**

जिल्हा कार्यालय व तालुका कार्यालयामध्ये आपत्ती नियंत्रण कक्ष स्थापन केले असुन ते वर्षभर 24 तास कार्यरत असते. आपतकालीन परिस्थितीत कार्यालयीन दुरध्वनी क्रमांकावर माहिती उपलब्ध होऊ शकते. जिल्हा स्तर व तालुका स्तरावरिल नियंत्रण कक्षाचे नियंत्रण अधिकारी यांचे नाव / दुरध्वनी क्रमांक दर्शविण्यात येत आहे.

- **गाव पातळीवरिल समिती :-**

प्रत्येक गाव पातळीवरिल आपत्ती व्यवस्थापन समितीमध्ये तलाठी,ग्रामसेवक,पोलीस पाटील, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य,सामाजिक कार्यकर्ता,मुख्याध्यापक,अंगणवाडी सेविका आणि ए.एन.एम. यांचा समावेश करण्यात येतो. यात्रेच्या नियोजनाकरिता त्यांची मदत घेण्यात येते. यात्रेचे नियोजन यशस्वी होण्यात ग्रामस्थांचे सहकार्य असणे आवश्यक आहे.

- **जिल्हा व तालुका नियंत्रण कक्षाचे दुरध्वनी क्रमांक**

| अ.क्र. | नियंत्रण कक्षाचे नाव | कोड नंबर | दुरध्वनी क्रमांक कार्यालय | दुरध्वनी क्रमांक निवास |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा | 07152 | 243446 | 240870 |
| 2. | उ.वि. अ. कार्यालय वर्धा | 07152 | 242561 | 240242 |
| 3. | उ.वि. अ. कार्यालय आर्वी | 07157 | 222028 | 222056 |
| 4. | उ.वि. अ. कार्यालय हिंगणघाट | 07153 | 244080 | 244036 |
| 5. | तहसिल कार्यालय वर्धा | 07152 | 240748 | 240741 |
| 6. | तहसिल कार्यालय सेलू | 07155 | 220259 | 220269 |
| 7. | तहसिल कार्यालय देवळी | 07158 | 254457 | 254458 |
| 8. | तहसिल कार्यालय आर्वी | 07157 | 222022 | 222179 |
| 9. | तहसिल कार्यालय आष्टी | 07156 | 225648 | 225637 |
| 10. | तहसिल कार्यालय कारंजा | 07156 | 245844 | 245843 |
| 11. | तहसिल कार्यालय हिंगणघाट | 07153 | 244022 | 244284 |
| 12 | तहसिल कार्यालय समुद्रपुर | 07151 | 225443 | 225444 |

**जिल्हयामध्ये होणा-या यात्रा, सार्वजनिक उत्सव, तसेच धार्मिक/सामाजिक स्वरुपाचे कार्यक्रम इ. मध्ये होणा-या गर्दीमुळे होणारे अपघात टाळण्याकरिता करावयाच्या उपाययोजने बाबत वर्धा जिल्हयाकरिता तयार करण्यात आलेला नियोजित**

## - यात्रा आपत्ती व्यवस्थापन आराखडा *(S.O.P.)*-

| अ. क्र. | गांवाचे नांव | पोलीस स्टेशन /संपर्क क्रमांक | यात्रा/ उत्सव स्थळाचे नाव/ ठिकाण | विश्वस्त/ट्रस्टीचे नांव व दुरध्वनी क्र. | यात्रेमध्ये अपेक्षित | यात्रेबाबतचा तपशिल व कालावधी | नोडल अधिका-याचे पदनांम व दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | जनसमुदाय | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **वर्धा तहसिल** | | | | |
| 1 | वायगांव(नि) | देवळी | व्यंकटेश बालाजी देवस्थान, वायगांव(नि) | श्री.सुनिल शंकर तळवेकर, अध्यक्ष मो.क्र.9423891611 श्री.हेमंत वसंतराव मंगरुळकर, सचिव दुर.क्र.-07152/280074 | अंदाजे - 7,000 | आश्विन शुध्द त्रयोदशीला - 2 दिवस (23 व 24 सप्टेंबर, 2017) | तहसिलदार, वर्धा 07152/240748 BDO, पं.स.,वर्धा 07152-243232 |
| 2 | पवनार | सेवाग्राम | पवनार आश्रमातील देवस्थानाचे पटांगणात धाम नदीचे पात्राजवळ. | | अंदाजे - 10,000 | दरवर्षी 12 फेब्रुवारी रोजी 1 दिवस | --#-- |
| 3 | सालोड (हिरापूर) | सेवाग्राम | सदानंद मठ, सालोड हिरापूर | श्री.माधवानंद फागोजी भलमे, रा.अल्लीपूर मठाधिपती | अंदाजे - 7,000 | पौष शुध्द चतुर्थीला 3 दिवस (5 ते 7 जानेवारी, 2018) | --#-- |
| | | | **देवळी तहसिल** | | | | |
| 4. | देवळी | देवळी | मिरननाथ महाराज देवस्थान,देवळी | श्री.फुटाणे, सचिव, मिरननाथ महाराज देवस्थान,देवळी मो.नं.9960005394 | अंदाजे 7,000 | पौष महिन्यात दत्त जयंती निमीत्त 15 दिवस(03/12/17ते 17/12/2017) | तहसिलदार,देवळी 07158/254457 BDO,पं.स.देवळी 07158-254122 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | सोनेगंाव (आबाजी) | देवळी | आबाजी महाराज देवस्थान सोनेगाव (आबाजी) | श्री. लक्ष्मीनारायण मुरलीधर देवस्थान, सोनेगाव (आबाजी)07158/203270 | अंदाजे - 5,000 | महाशिवरात्री निमीत्त 3 दिवस 13 ते 15 फेब्रु, 18) | --#-- |
| 6 | नाचनगांव | पुलगांव | सिद्धेश्वर देवस्थान-मंडळ,नाचनगांव | श्री. अशोकराव मेहकर,अध्यक्ष 9975764692 श्री.सुनिल नागतोडे, सचिव 9823239392 | अंदाजे - 5,000 | महाशिवरात्री निमीत्त 2 दिवस(13 ते 14 फेब्रुवार2018) | --#-- |
| 7 | कोटेश्वर | देवळी | कोटेश्वर महाराज देवस्थान, रोहणी | कोटेश्वर महाराज देवस्थान, रोहणी तर्फे येरावार, रा.यवतमाळ सचिव श्री.विरेंद्र देशपांडे मो.नं.9960502596 | अंदाजे - 7,500 | महाशिवरात्री निमीत्त (13 फेब्रुवारी 2018) | --#-- |
| **सेलु तहसिल** | | | | | | | |
| 8 | घोराड | सेलू | श्री.संत केजाजी महाराज देवस्थानला लागून विठ्ठल रुखमाई देवस्थान,घोराड | श्री.नानाजी खराबे,(अध्यक्ष) रा.घोराड मो.क्र.9922320795 श्री.बाबाराव तेलरांधे (विश्वस्त) | अंदाजे - 10,000 | *श्री राम नवमी निमीत्त 7 दिवस, (एप्रील-2018) | तहसिलदार,सेल 07155-220259 BDO,पं.स.सेलू |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 9763061943 | | ⁕आषाढी एकादशी निमीत्त 4 दिवस 4 ते 7/7/2017) | 01755-221240 | |
| | | | | | | ⁕श्री.संत नामदेव महाराज पुण्यतिथी उत्सव 7दिवस (21ते27 जूलै,17) | | |
| | | | | | | ⁕श्री.केजाजी महाराज पुण्यतिथी उत्सव 7 दिवस (जानेवारी, 2018 मौनी असावस्या), | | |
| | | | | | | ⁕कार्तीकी एकादश उत्सव 7 दिवस 14 ते 21/11/17 | | |
| 9 | पळसगांव बाई | सिंदी रेल्वे | पळसगांव बाई नदीच्या काठी गावाला लागून असलेल्या जागी | श्री.सुरेशराव लेंडे, रा.सिंदी(रेल्वे), अध्यक्ष मो.नं.9860573182 | अंदाजे - 10,000 | ⁕संत सखुमाई पुण्यतिथी 7 दिवस, (नोव्हे, 18) | --#-- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | श्री. राजु आडकिणे (सचिव) 9921559740 | | *प्रगटदिन गुढी पाडव्याचा तिस-या दिवसानंतर 7 दिवस 18 ते 24 मार्च18) | |
| 10 | सुकळी बाई | सेलू | सुकळी बाई येथे गावाला लागून असलेल्या मंदिराच्या जागेत | श्री.अशोक वासुदेव सराफ (अध्यक्ष) रा.वर्धा मो.नं.9822200251 | अंदाजे - 25,000 | हनुमान जयंती निमीत्त 2 दिवस (एप्रिल, 2018) | --#-- |
| 11 | केळझर | सेलू | केळझर गावाल लागून असलेल्या मंदिराच्या जागेत | श्री.माधवराव ईरुटकर (अध्यक्ष) श्री. माहादेवराव कापसे,(सचिव) | अंदाजे- 25,000 | *श्री सिध्दी विनायक गणपती मंदिर उत्सव 7 दिवस, पंचमी<br>*महालक्ष्मी प्रगटदिन 7दिवस,<br>*गणेश चतुर्थी उत्सव ( 25/08/17 ते 03/09/2017) | --#-- |
| 12 | वडगांव खुर्द | सेलू | वडगांव खुर्द गावात असलेल्या मंदिराच्या जागेत | श्री. मोहन महादेव खोडे, अध्यक्ष, रा. वडगाव (खुर्द) | अंदाजे - 7,000 | नागपंचमी उत्सव 2 दिवस 27 व 28 जुलै, 17 | --#-- |
| 13 | हमदापूर | दहेगांव गोसावी | हमदापूर गावांत असलेल्या मंदिराच्या जागेत | श्री. दिलीपराव बेनीगिरी, अध्यक्ष, रा. नागपूर | अंदाजे - 3,000 | महादेव देवस्थान काला 1 दिवस (13 फेब्रु, 2018) | --#-- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **आर्वी तहसिल** | | | | | | | |
| 14 | पिंपळखुटा | खरांगणा | सुभाष महाराज देवस्थान,पिंपळखुटा | श्री.मनोज मधुकरराव नेपटे, अध्यक्ष मो.क्र.9049090656 श्री.अनिल मांडगावकर(सचिव) | अंदाजे - 3,000 | रथसप्तमी निमीत्त 1 दिवस (जाने/फेब्रु. 2018) | तहसिलदार,आर्वी 07157/222022 BDO,पं.स.आर्वी - 07157/222048 |
| 15 | खरांगणा | खरांगणा | काळे महाराज देवस्थान खरांगणा | श्री.भास्करराव वाढई, अध्यक्ष क्र.07157/235112 | अंदाजे - 2500 | दत्त जयंती 2 दिवस (03 व04डिसे,17) | --#-- |
| 16 | महाकाळी | खरांगणा | महाकाळी | श्री.शंकरप्रसाद अग्निहोत्री, अध्यक्ष, | अंदाजे - 45,000 | देवीचे नवरात्र निमीत्त 9 दिवस 21 ते 30सप्टे,17 | --#-- |
| 17 | महाकाळी | खरांगणा | महाकाळी | श्री.किशोर वासुदेव माथनकर, अध्यक्ष मो.क्र.99238794263 | अंदाजे - 45,000 | देवीचे नवरात्र निमीत्त 9 दिवस 21 ते 30सप्टे,17 | --#-- |
| **आष्टी तहसिल** | | | | | | | |
| 18 | माणिकनगर | आष्टी | माणिकगड | श्री.विश्वनाथ यादवजी मोहोड, अध्यक्ष, मो.क्र.07156/232244 | अंदाजे - 3,000 | फेब्रुवारी महिन्यात 7 दिवस | तहसिलदार,आष्टी 07156/225648 BDO,पं.स.आष्टी 07156/225657 |
| 19 | आष्टी | आष्टी | आष्टी | श्री.जाकीर हुसेन अब्दुल हसीब, अध्यक्ष/पुजारी | अंदाजे - | हजरत पीर बाएजीद रहमतुल्लावाले दरगा | --#-- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मो.क्र.9423643715 | 2,500 | कमेटी चे वतीने उरुस निमीत्त नोव्हेंमध्ये 7 दिवस (रमजान महा के देड महिनापहिले) 15 साबान को | |
| 20 | तळेगावं | तळेगाव | गुरुदत्त दत्तात्रय देवस्थान कमेटी तळेगांव शामजीपंत | श्री.नयन सुखदास लड्ढा, अध्यक्ष,मो.क्र9975097514 श्री.रविंद्र गाडगे (सचिव) | अंदाजे - 3,000 | दत्त पौर्णीमा 4 दिवस (03 ते 06 डिसें, 2017) | --#-- |
| **कारंजा तहसिल** | | | | | | | |
| 21 | ढगा | खरांगणा | ढगा भुवन | गटविकास अधिकारी,पंचायत समिती | अंदाजे - 25,000 | महाशिवरात्री 4 दिवस (03 ते 06 फेब्रु, 2018) | तहसिलदार,कारंजा 07156/245844 BDO,पं.स.आष्टी 07156/245831 |
| 22 | नारा | | संत सखुमाता देवस्थान | मंदिर कमेटी | अंदाजे - 5,000 | नवरात्रीपासून | --#-- |
| 23 | कारंजा | कारंजा | गावातील टेकडीवरील देवस्थान | मंदिर कमेटी | अंदाजे - 20,000 | मे. 2018 | --#-- |
| **हिंगणघाट तहसिल** | | | | | | | |
| 24 | पोहणा | वडनेर | रुद्रेश्वर देवस्थान कमेटी, | श्री. ओमप्रकाश मोडारिया | अंदाजे - | महाशिवरात्री | तहसिलदार,हिंगणघाट |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पोहणा | मो.क्र.9890171336 | 3,000 | 1 दिवस<br>(03 फेबु 2018) | 07153/244022<br>BDO,पं.स.हिंगणघाट07153/244050 |
| 25 | कापसी | अल्लीपूर | देवस्थान कमेटी, कापसी | देवस्थान ट्रस्टी, कापसी<br>दुर.क्र.07153/270889 | अंदाजे -<br>15,000 | रथसप्तमीनिमीत्त 15 दिवस | --#-- |
| 26 | पारडी नगाजी | वडनेर | गोपालकृष्ण देवस्थान, पारडी | श्री.रामभाऊ बापुराव भोयर, (सचिव) मो.- 9823158771<br>श्री गुणवंत पळसराम खुनकर | अंदाजे -<br>5,,000 | श्री. नगाजी महाराज पुण्यतिथी (ऑक्टो - 2017)<br>श्री.कृष्ण जन्माष्टमी (14व15 ऑग,17) | --#-- |
| 27 | आजनसरा | वडनेर | भोजाजी महाराज देवस्थान,आजनसरा | श्री.धनराज जागो मेश्राम, उपाध्यक्ष<br>दुर.क्र.07153/320242 | अंदाजे -<br>45,000 | श्री.भोजाजी महाराज जयंती निमीत्त (एप्रिल 2018) व<br>पुन्यतीथी निमीत्य | --#-- |
| 28 | शहालंगडी | हिंगणघाट | हनुमान मंदीर देवस्थान शहालंगडी | श्री.महंत वासुदेव पुं. उभाड, अध्यक्ष, मो.क्र.9765142841 | अंदाजे -<br>10,000 | हनुमान जयंती<br>(एप्रिल, 2018) | --#-- |

## समुद्रपुर तहसिल

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 29 | मांडगांव | हिंगणघाट | श्री.संत ब-हाणपुरे महाराज देवस्थान,मांडगांव | श्री.नामदेवराव घुसे, अध्यक्ष, मो.क्र.9881554475<br>श्री. लक्ष्मण वाटकर सचिव, 9922630983 | अंदाजे - 5,000 | श्री.संत ब-हाणपुरे महाराज प्रकट दिन दि.14 जानेवारी,18 | तहसिलदार,समुद्रपूर 07151/225043<br>BDO,पं.स.समुद्रपूर 07151/225434 |
| 30 | मांडगांव | हिंगणघाट | श्रीराम देवस्थान कमेटी, मांडगांव | श्री.नारायण पाहुणे, अध्यक्ष, श्रीराम देवस्थान,मांडगांव मो.क्र.9326960946 | अंदाजे - 2,000 | रामनवमी निमीत्त 2 दिवस | --#-- |
| 31 | कोरा | समुद्रपूर | श्री.हनुमान देवस्थान कमेटी, कोरा | श्री.रामभाऊ पंढरे,अध्यक्ष दुर.क्र.07151/234749 | अंदाजे - 3,000 | हनुमान जयंती निमीत्त | --#-- |
| 32 | पहाडफरीद गिरड | गिरड | दर्गा शरीफ खाना शेख फरिद,गिरड | श्री.काजी करिमुद्यीन, अध्यक्ष | अंदाजे - 25,000 | बाबा फरिद यांची पुण्यतिथी 2 दिवस | --#-- |
| 33 | गिरड | गिरड | श्री राम मंदिर ट्रस्ट गिरड | श्री.वसंतराव का. परबत,गिरड दुर.क्र.071751/236283 | अंदाजे - 10,000 | रामनवमी निमीत्त | --#-- |
| 34 | कृष्णपेठ (रिठी) | | कृष्णपेठ (रिठी) | मंदिर कमेटी | अंदाजे - 15,000 | डिसेंबर - जानेवारी | --#-- |